| MHYA050006432024 | –: निकालपत्र :–<br>(घोषीत तारीख १५/०६/२०२६)<br>सरकार विरुद्ध सुनिता मोहन राठोड |
|---|---|

१. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतो, त्यास खालील कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबीत केले काय की, दिनांक २४/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे आरेगाव, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशिररीत्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये प्रत्येकी अंदाजे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण किंमत अंदाजे १२५०/– रुपये विक्री करण्याच्या उद्देशाने व स्वतःचे आर्थिक फायद्याच्या उद्देशाने बाळगून होता आणि त्याअंतर्गत आरोपीने मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) नुसार अपराध केला? | **नाही.** |
| २. | काय आदेश? | **आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते.** |

## –: कारणमिमांसा :–

**प्रश्न क्रमांक १ साठी**–

२. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ 'एक' साक्षीदारांची साक्ष नोंदवली. साक्षीदार क्रमांक–**१ संदीप दुधराम पवार** यांची साक्ष **निशाणी क्रमांक–६** वर नोंदविण्यात आली. अभियोगपक्षास वारंवार संधी देऊनही त्यांनी फिर्यादी, इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी व पंच साक्षीदारांची व तपासी अधिकारी यांची साक्ष घेतली नाही. अभियोगपक्षाने त्यांचा पुरावा निशाणी क्रमांक–१ प्रमाणे बंद केला. कोणीही साक्षीदार तपासले नाही.

३. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोगपक्षने शाबीत करणे गरजेचे आहे की, दिनांक २४/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे आरेगाव, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशिररीत्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये प्रत्येकी अंदाजे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण किंमत अंदाजे १२५०/– रुपये विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला. सदर अपराध सिद्ध करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–**१ संदीप दुधराम पवार** यांची साक्ष **निशाणी क्रमांक–६** वर नोंदविण्यात आली. उपरोक्त साक्षीदार हे घटना स्थळ व जप्ती पंचनाम्यावरील 'पंच साक्षीदार' असून त्यांनी साक्षीदरम्यान कथन केले की, ते आरोपीस ओळखतात. दिनांक २४.०१.२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता कोठेही बोलावले नव्हते. पोलीसांनी त्यांचेसमक्ष कोणतीही जप्तीची कारवाई केली नाही व पंचनामा केला नाही. त्यांना दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असून सहीस निशाणी क्रमांक पी१/पी.डब्ल्यू१ देण्यात आला. त्यांना पंचनाम्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले. पंच साक्षीदाराने

अभियोगपक्षस मदत केली नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना भारतीय पुरावा कायदा कलम–१५४ अन्वये साक्षीदार यांना उलटतपासात विचारता येतील असे 'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. परंतु, उलटतपासातही उपरोक्त साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनेच्यादिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा दोषारोपात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २४/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे आरेगाव, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशिररीत्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये प्रत्येकी अंदाजे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण किंमत अंदाजे १२५०/– रुपये विक्री करीत होता किंवा विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून होता असे काहीही अभियोगपक्षास निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा सिद्ध करु शकला नाही.

४. अभियोगपक्षास वारंवार संधी देवूनही अभियोगपक्ष फिर्यादी, इतर स्वतंत्र साक्षीदार यांना तपासु शकले नाही. परंतु, प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विश्लेषणासाठी नमुना पाठविण्याबाबत प्रोफॉर्म दाखल केलेला आहे. तसेच, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल (सी.ए.फॉर्म) देखील या खटल्यात तपासअधिकारी यांनी दाखल केलेला असला तरी प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व तपासी अधिकारी यांची साक्ष झालेली नसल्यामुळे फिर्याद देखील सिद्ध झालेली नाही. त्यामुळे घटनेच्या दिवशी पोलीसांनी आरोपीचीच घर झडती घेवून त्याच्या ताब्यातून एका प्लॅस्टीक कॅनमध्ये प्रत्येकी अंदाजे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण किंमत अंदाजे १२५०/– रुपये विक्री जप्त केली, तो नमुना म्हणून रासायनिक विश्लेषणासाठी

पाठविला हे सिद्ध झालेले नाही. प्रस्तुत प्रकरणात नमुना वाहक यांना देखील तपासले नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात घटनेच्या दिवशी एका प्लॅस्टीक कॅनमध्ये प्रत्येकी अंदाजे २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण किंमत अंदाजे १२५०/– रुपयेची दारु मिळून आली ही बाब संशयाच्या पलिकडे सिद्ध होण्याइतपत सबळ पुरावा अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सिद्ध केलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने प्रस्तुतची केस सामान्य बुद्धीच्या संशयापलीकडे सिद्ध केली नाही. सबब, आरोपीविरुद्ध मुंबई दारुबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये गुन्हा केला हे सिद्ध करणारा सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. परिणामतः आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. वरील कारणास्तव मी ***प्रश्न क्रमांक–१*** चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ साठी**–

**५.** वरील सर्व साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता, अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिद्ध करु शकला नाही. परिणामतः आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब मी प्रश्न क्रमांक–२ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

| –: **आदेश** :– | |
|---|---|
| **१.** | फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५५(१) अन्वये आरोपी **सुनिता मोहन राठोड** हिची मुंबई दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये ठेवलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| **२.** | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त केलेला मुद्देमाल नाश केला नसल्यास तो मुद्देमाल अपिल कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क, पुसद यांच्याकडे नियमाप्रमाणे नाश करण्याकरिता पाठविण्यात यावा. |
| ४. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४३७ अ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहण्यासाठी म्हणून दाखल केलेली रक्कम रुपये १५,०००/–(पंधरा हजार रुपये मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्राची मुदत ६ महिने राहिल. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).** |

***Sd/-***

दिनांक १५/०६/२०२६

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पुसद (न्यायालय क्र.२)
ता. पुसद, जि. यवतमाळ.